**<u>प्रेसनोट दिनांक ०३/०३/२०१९</u>**

**दत्तवाडी पोलीस स्टेशन, पुणे शहर**

**<u>"दत्तवाडी पोलीस स्टेशनच्या अधिकाांचा निरोप समारंभ"</u>**

लोकसभा निवडणुक २०१९ च्या पार्श्वभुमीवर भारत निवडणुक आयोगाच्या मार्गदर्शक तत्वानुसार सर्व शासकीय अधिका-यांची इतरत्र बदली करण्याचे आदेश असल्यामुळे पुणे पोलीस आयुक्तालयात सध्या बदल्यांचे जोरदार वारे वाहत आहे. त्या प्रमाणे दत्तवाडी पोलीस स्टेशन मधील पोलीस उप निरीक्षक अनिल डफळ, रुपाली कुलथे, विलास गुजर, अनिल आदलिंग यांच्या इतरत्र बदली झाली.

काम तर सर्वांना करावेच लागते परंतु काम करताना आपण किती माणसे जोडली यावरुन आपली समाजामध्ये ओळख निर्माण होते आणि त्यातल्या त्यात पोलीस खात्यात काम करत असताना समाजातील विविध घटकांशी म्हणण्यापेक्षा सर्वांशी संबंध येत असतो त्यातच आपल्या कामाचा ठसा उमटला जातो आणि समाजाशी एक वेगळेच नाते तयार होते. शासकीय विभागात काम करत असताना बदली होणे हे काय नवीन नाही यातच दत्तवाडी पोलीस स्टेशन येथे नेमणुकीस असलेले वरील अधिकारी यांच्या इतरत्र बदल्या झाल्या. गेली १-२ वर्षे त्यांनी दत्तवाडी पोलीस स्टेशन येथे आपले कर्तव्य चोख व प्रामाणिकपणे केले. त्यांच्याशी पोलीस स्टेशनचे एक वेगळयाच प्रकारे नाते व आपुलकीची भावना निर्माण झाली होती. म्हणुन त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यासाठी दत्तवाडी पोलीस स्टेशनच्या वतीने निरोप समारंभ दि.०१/०३/२०१९ रोजी आयोजित करण्यात आला होता. या प्रसंगी दत्तवाडी शांतता कमिटी च्या सौ.अलका जाधव, धनश्री पुराणिक, सुप्रिया साठे, मोहम्मद अली शेख, शिवाजी गदादे पाटील, समीर पवार, निलेश पवार, अप्पा गायकवाड, हमीद मुलानी, विजय शिंदे, शेखर वाळुनजकर तसेच वरील अधिका-यांनी कमवीलेले समाजातील विविध घटकांतील नागरिक मोठया संख्येने त्यांना निरोप देण्यासाठीउपस्थित होते.

या प्रसंगी उपस्थित सर्व नागरिकांनी या अधिका-यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमाचे आयोजन देविदास घेवारे वरिष्ठ पोलीस निरीक्षक दत्तवाडी पोलीस स्टेशन यांनी केले होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सहाय्यक पोलीस निरीक्षक शंकर सलगर, पोलीस उप निरीक्षक कुलदिप संकपाळ, विलास गुजर, प्रणिता हजारे यांनी विशेष प्रयत्न केले.

**(देविदास घेवारे)**
वरिष्ठ पोलीस निरीक्षक
दत्तवाडी पोलीस स्टेशन, पुणे शहर.





